| | | |
|---|---|---|
| | **पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ- III, पिंपरी चिंचवड**<br>**पत्ता :दुसरा मजला एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे,**<br>**पी.सी.एन.टी.डी.ए. सर्कल, सेक्टर नं.०७, स्पाईन रोड, भोसरी पुणे,**<br>**४११०२६,** | |
| जा.क्र./पोउपआ/परि-२/ | /२०२५ पिं. चिं. | दि. 2८/02/२०२५ |

**<u>प्रेस नोट दिनांक :- २८/०२/२०२५</u>**

**<u>पोलीस उप आयुक्त, परिमंडळ III, पिंपरी चिंचवड यांचेकडुन एकूण २२ सराईत गुन्हेगारांवर हद्दपार कारवाई</u>**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील गुन्हेगारी वृत्तीस आळा घालणेकामी व गुन्ह्यांना प्रतिबंध करणेकामी पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांवर ठोस व परिणामकारक अशी कारवाई करणेबाबत आम्ही परिमंडळ III कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशनला आदेश दिलेले होते. सदर आदेशास अनुसरुन परिमंडळ III कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनकडील सराईत गुन्हेगारांना माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ५५, ५६ व ५७ प्रमाणे हद्दपार करण्यात आले आहे.

खालील सराईत गुन्हेगारांना पुणे जिल्ह्याचे हद्दीतुन नमुद कालावधीप्रमाणे हद्दपार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | आरोपी नाव | तडीपार कालावधी |
|---|---|---|---|
| १ | एमआयडीसी भोसरी | शकील ख्वाजा काझी, वय २६ वर्षे, रा. विठ्ठलनगर लांडेवाडी झोपडपट्टी, भोसरी, पुणे **(घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापुर्वक दुखापत पोचवणे, दरोडा, धमकावणे, मारहाण करणे, अपनयन, बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगणे, दहशत माजवणे, मनाई आदेशाचा भंग करणे, बलात्कार तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासुन प्रतिबंध अधिनियमान्वये कलमांतर्गत यासारखे एकूण ०३ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरीता |
| २ | एमआयडीसी भोसरी | महिला नामे- धनदेवी अर्जुन कंजारभट, वय ४० वर्षे, रा. मोशी, ता. हवेली, जि. पुणे. **(महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमांतर्गत - बेकायदेशीर व अवैध हातभट्टी तयार दारु जवळ बाळगुन विक्री करणे यासारखे एकूण ०५ गुन्हे दाखल आहेत)** | ०१ वर्षाकरीता |
| ३ | दिघी | महिला नामे - शारदादेवी अरविंद चौहान (नट), वय ३४ वर्षे, रा. दिपक तापकीर यांचे शेतात, स्प्रींग व्हॅली सोसायटीचे पाठीमागे, वडमुखवाडी, ता. हवेली, जि. पुणे **(महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमांतर्गत - बेकायदेशीर व अवैध हातभट्टी तयार दारु जवळ बाळगुन विक्री करणे यासारखे एकूण ०३ गुन्हे दाखल आहेत)** | ०१ वर्षाकरीता |
| ४ | दिघी | महिला नामे निशा सत्यवान कुंभार, वय ३० वर्षे, रा. मुर्ती सोसायटी समोर, यमाईनगर, दिघी, ता. हवेली, जि. पुणे. **(महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमांतर्गत - बेकायदेशीर व अवैध हातभट्टी तयार दारु जवळ बाळगुन विक्री करणे यासारखे एकूण ०६ गुन्हे दाखल आहेत)** | ०१ वर्षाकरीता |
| ५ | दिघी | महिला नामे सुनिता पारस भाट, वय २५ वर्षे, रा. मुक्ताई लॉन्स समोर, पत्र्याचे शेडमध्ये, चोवीसावाडी, पुणे **(महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमांतर्गत - बेकायदेशीर व अवैध हातभट्टी तयार दारु जवळ बाळगुन विक्री करणे यासारखे एकूण ०९ गुन्हे दाखल आहेत)** | ०१ वर्षाकरीता |
| ६ | दिघी | बालाजी राजेश बिडगर, वय ४० वर्षे,रा. काळे कॉलनी, देहुफाटा, चऱ्होली (बु), ता. हवेली, जि. पुणे. **(लोकसेवकाने रितसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा, जीवीतास धोका असलेल्या रोगाचा संसर्ग पसरविण्याचा संभव, राष्ट्रीय आपत्ती अधिनियमान्वये, महाराष्ट्र जुगार कायदा कलमान्वये असे एकूण ०३ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी दोन गुन्ह्यांमध्ये मा. न्यायदंडाधिकारी सो, खडकी, पुणे यांनी आरोपीस सिद्धपराध ठरविले आहे.)** | ०३ महिने |
| ७ | दिघी | सोपीसाप बडेसाप हवालदार, वय ४० वर्षे,रा. शांतीनगर, कॉलनी नं. १, | ०३ महिने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शिवालाल मंदराजवळ, भोसरी, ता. हवेली, जि. पुणे. (**महाराष्ट्र जुगार कायदा कलमान्वये ०१ गुन्हा दाखल आहे. नमुद गुन्ह्यांमध्ये मा. न्यायदंडाधिकारी सो, खडकी, पुणे यांनी आरोपीस सिद्धपराध ठरविले आहे.)** | |
| ८ | दिघी | जयचंद नारायण इरगट, वय ४४ वर्षे,रा. जगताप मंगल कार्यालयाचे समोर, काळे कॉलनी, पानसरे यांचे खोलीत भाड्याने, आळंदी देवाची, पुणे. (**महाराष्ट्र जुगार कायदा कलमान्वये ०२ गुन्हे दाखल आहेत. दोन्ही गुन्ह्यांमध्ये मा. न्यायदंडाधिकारी सो, खडकी, पुणे यांनी आरोपीस सिद्धपराध ठरविले आहे.)** | ०३ महिने |
| ९ | चिखली | **१)आकाश शंकर जाधव,** वय २४ वर्षे, रा. टॉवर लाईन आयकॉन हॉस्पीटलजवळ त्रिवेणीनगर, निगडी, पुणे **(टोळी प्रमुख)**<br>**२)आशितोष नानासाहेब घोडके,** वय २३ वर्षे, रा. गुरुदृत्त हौ. सोसा. तुळजाभवानी मंदिरामागे त्रिवेणीनगर, तळवडे पुणे **(टोळी सदस्य)**<br>**(चोरी यासारखे एकूण १४ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरीता |
| १० | चिखली | दिगंबर काशिनाथ जामदारे, वय १९ वर्षे, रा. अजंठानगरकडे जाणाऱ्या रोड लगत कृष्णा शेळके यांचे घरी, गौरी निवास, भारत गॅस एजन्सी शेजारी, कस्तुरी मार्केट चिंचवड, पुणे, मुळ रा. जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर **(चोरी, बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचा भंग करणे यासारखे एकूण ०४ गुन्हे दाखल आहेत.)** | ०१ वर्षाकरीता |
| ११ | चिखली | दशरथ सिताराम कसबे, वय ४७ वर्षे, रा. पांडुरंग नेवाळे यांची खोली नेवाळेवस्ती, पाटीलनगर, चिखली, पुणे **(महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमांतर्गत - बेकायदेशीर व अवैध हातभट्टी तयार दारु जवळ बाळगुन विक्री करणे यासारखे एकूण ०३ गुन्हे दाखल आहेत)** | ०१ वर्षाकरीता |
| १२ | चाकण | उद्धव ऊर्फ सूरज रमेश कुटे, वय २३ वर्षे, रा. तुकाईनगर, भोसे, ता. खेड, जि. पुणे **(खुनाचा प्रयत्न करणे, इच्छापुर्वक दुखापत, धमकावणे, शांतता भंग घडवुन आणण्याचे उद्देशाने अपमान करणे, धाकदपटशा, गैरनिरोध, बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचा भंग करणे यासारखे एकूण ०४ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरीता |
| १३ | चाकण | उत्तमसिंग रामकुमार राठोड वय ४५ वर्षे, रा. भोसे ता. खेड, जि. पुणे **(खंडणी वगैरेकरीता अपहरण, गैरपरिरोध, इच्छापुर्वक दुखापत, शांतताभंग घडवुन आणण्याचे उद्देशाने अपमान करणे, धाकदपटशा, बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचा भंग करणे, महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमांतर्गत - बेकायदेशीर व अवैध हातभट्टी तयार दारु जवळ बाळगुन विक्री करणे यासारखे एकूण ०८ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरीता |
| १४ | चाकण | करण पांडुरंग सुरवसे, वय २९ वर्षे, रा. महात्मा फुलेनगर, मार्केट यार्ड, चाकण,ता. खेड, जि. पुणे **(इच्छापुर्वक दुखापत पोचवणे, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करण, बलात्कार तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासुन प्रतिबंध अधिनियमान्वये कलमांतर्गत यासारखे एकूण ०२ गुन्हे दाखल आहेत.)** | ०१ वर्षाकरीता |
| १५ | चाकण | रोहन महेंद्र घोगरे, वय २२ वर्षे, रा. खंडोबा माळ, आंबेडकरनगर, चाकण, ता. खेड जि. पुणे **(खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीर जमावाचा सदस्य होवुन प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होवुन दंगा करणे, घातक हत्याराने इच्छापुर्वक दुखापत करणे, फौजदारीपात्र बलप्रयोग, धमकावणे, मारहाण करणे, बेकायदेशिर शस्त्र जवळ बाळगणे यासारखे एकूण ०६ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरीता |
| १६ | चाकण | सुरज ऊर्फ सनी रमेश गाडेकर, वय २४ वर्षे, रा. खंडेश्वर कॉलनी, चाकण, ता. खेड, जि. पुणे ( **खून, खुनाचा पयत्न, इच्छापुर्वक दुखापत, गैरनिरोध, प्राण घातक हत्यारानिशी दंगा करणे, कट रचने, बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगणे, दहशत निर्माण करणे तसेच** | ०१ वर्षाकरीता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम कलमांतर्ग- यासारखे एकूण ०६ गुन्हे दाखल आहेत.)** | |
| १७ | आळंदी | दिनेश नाना लुटे, वय २४ वर्षे, रा. सोमनाथ मुंगसे यांचे घरापुढे केळगाव ता. खेड, जि. पुणे. (**बेकायदेशीर अग्नी शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचा भंग करणे- यासारखे एकूण ०२ गुन्हे दाखल आहेत.)** | ०१ वर्षाकरीता |
| १८ | आळंदी | शेखर नंदकुमार शिंदे, वय २९ वर्षे रा. भुसेआळी, मरकळ, ता. खेड, जि. पुणे (**विनयभंग बलप्रयोग, इतरांची सुरक्षितता धोक्यात आणण्याच्या कृतीने जबर दुखापत पोचवणे, इच्छापुर्वक दुखापत पोचवणे, बेकायदेशीर जमावाचा घटक होवुन दंगा करणे, बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचा भंग करणे- यासारखे एकूण ०३ गुन्हे दाखल आहेत.)** | ०६ महिने |
| १९ | आळंदी | महिला नामे- वंती देवीदास नानावत ऊर्फ रजपुत, वय ३२ वर्षे, रा. कंजारभट वस्ती भिवरेवाडी, कोयाळी, ता. खेड, जि. पुणे (**महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमांतर्गत - बेकायदेशीर व अवैध गावठी हातभट्टी दारु तयार करण्याकरीता लागणारे कच्चे रसायन दारु जवळ बाळगुन, हातभट्टीची दारु भट्टी अनाधिकराने लावुन, दारु तयार करुन विक्री करणे. यासारखे एकूण १३ गुन्हे दाखल आहेत.)** | ०१ वर्षाकरीता |
| २० | आळंदी | वसिम हुसेन शेख वय २९ वर्षे,रा.०४ नंबर शाळेजवळ आळंदी, ता.खेड जि.पुणे,मुळ कोरडे डेअरीचेवर देहुफाटा आळंदी ता.हवेली जि.पुणे (**खून, खुनाचा प्रयत्न, कट रचणे, प्राणघातक हत्यारानिशी दंगा करणे, विनयभंग, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, मारहाण करणे, बेकायदेशीर जमावाचा घटक होवुन दंगा करणे, मनाई आदेशाचा भंग करणे, बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगणे, यासारखे एकूण ०७ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरीता |
| २१ | महाळुंगे एमआयडीसी | परिक्षित प्रकाश शेट्टी, वय २२ वर्षे, रा. तुकारामनगर, अंबिका गार्डन, तळेगाव दाभाडे, पुणे (**महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमांतर्गत - बेकायदेशीर देशी विदेशी दारु बाटल्या जवळ बाळगुन विक्री करणे यासारखे एकूण ०३ गुन्हे दाखल आहेत)** | ०१ वर्षाकरीता |

उपरोक्त सर्व तडीपार इसम/महिला हे २० ते ४७ वयोगटातील सराईत गुन्हेगार आहेत. सन २०२४ अखेरपर्यंत परिमंडळ III पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील १५० गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे. जानेवारी २०२५ मध्ये १५ आरोपींना हद्दपार करण्यात आले आहे. तसेच दि. ११.०२.२०२५ दि. १७.०२.२०२५ व दि. २७.०२.२०२५ रोजी एकूण २२ आरोपींना हद्दपार करण्यात आले आहे.

तसेच परिमंडळ III पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील १०० हुन अधिक गुन्हेगारांचे हालचालींवर पोलीसांचे बारकाईने लक्ष आहे. सराईत गुन्हेगारांना गुन्हे करण्यापासुन परावृत्त करण्यासाठी व गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ठोस व परिणामकारक प्रतिबंधक कारवाई करणार आहोत.

वरीलप्रमाणे हद्दपार करण्यात आलेले सराईत गुन्हेगार हे त्यांचे हद्दपार कालावधीमध्ये पुणे जिल्ह्यात दिसुन आल्यास तात्काळ नियंत्रण कक्ष संपर्क क्र. ११२ तसेच जवळील संबंधित पोलीस ठाणेस संपर्क साधुन माहिती कळविण्याबाबत आम्ही डॉ. शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ III , पिंपरी चिंचवड सर्व नागरीकांना आवाहन करीत आहोत.

Pawar
28/02

**(डॉ. शिवाजी पवार)**
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ- III, पिंपरी चिंचवड